**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इ-मेल cp.thane.pro@mahapolice.gov.in
मोबाईल क्रमांक : ९८१९२०८२७९

**प्रेसनोट** **दिनांक १८.११.२०२४**

**" विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ करीता ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या पुर्वतयारीबाबत. "**

आगामी **विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४** च्या अनुषंगाने दि. २०/११/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. ते सायंकाळी १८.०० वा. च्या दरम्यान मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सदर मतदान प्रक्रिया सूरळीत व निर्विघ्नपणे पार पडण्याच्या दृष्टीने तसेच कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून सर्वतोपरी चोख व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून मतदान प्रक्रीया सुरळीत पार पडण्यासाठी वापरण्यात येणारे मनुष्यबळ :-**

१) सदर मतदान प्रक्रीया पार पडण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयातील एकुण **७९८०** पोलीस अधिकारी व अंमलदार तैनात करण्यात आलेले आहेत.
२) तसेच एकुण **२०८८** होमगार्ड्स तैनात करण्यात आलेले आहेत.
३) राज्य राखीव पोलीस बल (S.R.P.F) च्या एकुण **०३,** केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दल (C.I.S.F) च्या **०५,** केंद्रिय राखीव पोलीस दल (C.R.P.F) च्या **०३,** सिमा सुरक्षा बल (S.S.B) च्या **०४,** उत्तराखंड राज्य राखीव दल (S.A.P.F) येथील **०३** अश्या एकुण **१८** कंपन्या अतिरीक्त मनुष्यबळ देखील तैनात करण्यात आलेले आहे.
४) याव्यतिरीक्त स्थानिक पातळीवर पोलीसांना मदत व्हावी या दृष्टीने नॅशनल कॅडेट कोअर (N.C.C) चे **११५४**, नॅशनल सर्विस स्किम (N.S.S) चे **३५८** व विशेष पोलीस अधिकारी (S.P.O) चे **१५,** R.S.P चे **१४,** सुरक्षा रक्षक **६६,** पोलीस मित्र **१०५२,** स्काऊट ऑण्ड गाईड चे **२०** असे एकुण **२६७९** इतके पोलीस व स्वयंसेवक तैनात करण्यात आलेले आहेत.

**प्रतिबंधक कारवाई :-**

सदरची मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडावी यादृष्टीने ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील सराईत गुन्हेगारांवर खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

अ) एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आलेल्या एकुण कारवाई :- **०६**
ब) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२४ कलम १२६, १२८ व १२९ अन्वये कारवाई :- **४०८१**
क) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५,५६ व ५७ अन्वये हद्दपार कारवाई :- **११६**
ड) महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ९३ अन्वये कारवाई :- **१६१**

**रूट मार्च :-**

या व्यतिरीक्त सदर निवडणूक प्रक्रिया भयमुक्त वातावरणात पार पडण्याकरीता स्थानिक पोलीस व बाहेरून आलेले अतिरीक्त पोलीस यांच्या मदतीने ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणेमध्ये एकुण **३०० रूट मार्च** चे आयोजन करण्यात येवून एरीया डॉमिनेशन करण्यात आले व सदर निवडणूकीत कायदा व सुव्यवस्थेची कोणतीही परिस्थीती हाताळण्यास पोलीस दल सक्षम आहे असे सामान्य नागरिकांना आश्वासीत करण्यात आले.

**<u>नाकाबंदी दरम्यान केलेली कारवाई :-</u>**

यात्यतिरीक्त स्थानिक पोलीस व निवडणूकीसाठी स्थापन करण्यात आलेले एस.एस.टी/एफ.एस.टी. पथकामार्फत आचारसंहिता सुरु झाल्यापासून एकुण **९,१३,७१,६००/- रू. (नऊ कोटी तेरा लाख एक्काहत्तर हजार सहाशे रूपये)** इतकी बेहिशोबी रोख रक्कम तसेच **१३,२६,३७७/-रू. (तेरा लाख सव्वीस हजार तिनशे सत्याहत्तर रूपये)** इतक्या किंमतीचे मौल्यवान धातू (उदा. सोने, चांदी) जप्त करण्यात आलेली आहेत.

**<u>अवैध शस्त्रे जप्ती कारवाई :-</u>**

आचारसंहिता लागु झाल्यापासून पोलीस ठाणे पातळीवर विशेष अभियानाअंतर्गत उदा. कोंबींग ऑपरेशन, ऑपरेशन ऑल आऊट इत्यादी राबवून आतापर्यंत **५९** इतकी अग्निशस्त्रे, **८५** जिवंत काडतूसे तसेच २५२ चाकू/सुरे अशी हत्यारे जप्त करून संबंधीतांवर कडक कायदेशिर कारवाई करण्यात आलेली आहे.

**<u>बेकायदेशिर दारू/अंमली पदार्थ/गुटखा जप्ती कारवाई :-</u>**

आचारसंहिता लागु झाल्यापासून ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सुमारे **१३,००० लिटर** बेकायदेशिर देशी/विदेशी व गावठी दारू जप्त करण्यात आली असून सुमारे **१,४५,३२० लिटर** दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन नाश करण्यात आलेला आहे. तसेच सुमारे **६५ किलोग्राम** गांजा, एम. डी. इत्यादी अंमली पदार्थ देखील जप्त करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे **१,०२,७२,२१९/- रू. (एक कोटी दोन लाख बहात्तर हजार दोनशे एकोणिस रूपये)** किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा जप्त करण्यात आलेला आहे.

यात्यतिरीक्त आचारसंहितेचा भंग होणार नाही यादृष्टीने सतत लक्ष रहावे म्हणून संपूर्ण पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रामधील प्रत्येक पोलीस ठाण्याकडून प्रत्येकी ०५ ड्रोन कॅमेरेद्वारे निगराणी ठेवण्यात येत असून मतदानाच्या दिवशी ती अधिक परिणामकारक करण्यात येणार आहे.

दिनांक २०/११/२०२४ रोजीची विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ मधील मतदान प्रक्रीया सुरळीत पार पडावी या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना करण्यात आली असून पोलीस यंत्रणा सर्वतोपरी सुसज्ज आहे. सर्व नागरिकांनी भयमुक्त वातावरणात मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन श्री. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी सर्व नागरिकांना केले आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर